

# प्रतिभा, कलानिर्मिती आणि कलाभ्यास

संपादक
अरुण जाखडे

१५.०१.2022
पुणे, प्रकाशन समारंभ

# प्रतिभा, कलानिर्मिती आणि कलाभ्यास

संपादक

**अरुण जाखडे**

पद्मगंधा प्रकाशन

Pratibha, Kalanirmiti Aani Kalaabhyas

Edited by Arun Jakhade

**प्रकाशक** । भारती जाखडे
पद्मगंधा प्रकाशन
३६/११, धन्वंतरी सह. गृह. संस्था,
पांडुरंग कॉलनी, एरंडवन,
पुणे - ४११०३८
फोन : (०२०) २५४४२४५५
मो. ७३५०८३९१७६
p.padmagandha@gmail.com
www.padmagandha.com

© भारती जाखडे

**मुखपृष्ठ** । रविमुकुल

**प्रथमावृत्ती** । १४ जानेवारी २०२३

**मुद्रक** । इंडिया प्रिंटिंग वर्क्स,
मुंबई-४०००३१

**मूल्य** । ₹ १२००

ISBN 978-93-91352-54-7

https://www.facecook.com/pages/Padmagandha-Prakashan

...प्राण येतो निर्जीवात! - *सीमा शेटे-रोठे* । २१७
प्रतिभा, सर्जन आणि संगीत - *डॉ. चैतन्य कुंटे* । २२३
संगीतातील कलानिर्मिती - *डॉ. साधना शिलेदार* । २४१
कलानिर्मिती : एक प्रतिभासंपन्न प्रवास - *डॉ. माधुरी आपटे* । २४८
प्रतिभेचा कलानिर्मितीकडे होणारा प्रवास - *प्रभाकर कोलते* । २५७
आदिवासी लोकचित्रकारांच्या कुंचल्यातून 'कोरोना' - *प्रतिभा वाघ* । २६६
प्रवाशाला वाट दाखविणारी प्रतिभा - *पंकज विश्वास भांबुरकर* । २८१
प्रतिभेची चंद्रकोर आणि कलेची पौर्णिमा - *विजयराज बोधनकर* । २९७
गिव्ह पटेल - *चारुदत्त पांडे* । ३११
गॉडी – द गॉडज् आर्किटेक्ट - *अदिती जोगळेकर-हर्डीकर* । ३२७
दृश्यचौकटीतून अभिव्यक्त होणारा कलावंत... - *अंजली अंबेकर* । ३३९
फोटोग्राफी : सर्जनाचा प्रवास - *मिलिंद ढेरे* । ३५६
धुक्याचा आकार शोधताना... - *राहुल देशपांडे* । ३८५

भाग दोन

## सर्जनशीलता आणि कलाभ्यास

लेखकाला अभ्यासाची गरज नसते का? - मोहिनी पिटके । ३९९
कवीच्या प्रतिभेला तादात्म्याचीही जोड हवी! - देवानंद सोनटक्के । ४१२
लेखन, एक अभ्यास! - रवींद्र कुलकर्णी । ४२४
अभ्यासाने कलेचा प्रदेश अधिक विस्तीर्ण आणि गहिरा होतो...
- पंडित सत्यशील देशपांडे (शब्दांकन : अंजली अंबेकर) । ४३५
गाण्यातून ज्ञानाकडे - प्राची वैद्य (दुबळे) । ४४८
अभ्यासातून प्रयोग, परंपरा आणि कलानुभव - मुकुंद संगोराम । ४५७
चित्रकाराला अभ्यासाची गरज असते काय? - दीपक घारे । ४६४
कलाध्यास : चिंतन व सराव - दिलीप रानडे । ४७२
'स्व'चं वर्तुळ विस्तारताना... - अदिती जोगळेकर-हर्डीकर । ४७८
दृश्यकलांचा अभ्यास - चारुदत्त पांडे । ४९१
रेषेचं मूळ आणि सुराचं कूळ - उज्ज्वला अन्नछत्रे । ५०९

# कवीच्या प्रतिभेला तादात्म्याचीही जोड हवी!

देवानंद सोनटक्के

। १ ।

वाङ्मयीन तादात्म्याची प्राथमिक पात्रताच मराठी लेखकांत फारशी दिसत नाही, आणि ज्यांच्यात आहे त्यांना लिहिण्याची इतकी घाई झालेली असते की, जणू काही त्यांना अभ्यासाने काही फायदा होतो ही कल्पनाच नसते. प्राथमिक पात्रता ही ईश्वरदत्त देणगी आहे, पण अभ्यासाने तिचे संगोपन करणे हे लेखकाचे कर्तव्य आहे. प्रत्येकालाच प्रत्येक क्षणाला वाल्मिकी होता येत नाही. मराठी वाङ्मयाच्या हिणकसपणाचे एक कारण जरी लेखकांच्या जीवनानुभव क्षेत्राचा संकुचितपणा हे आहे, असे गृहीत धरले तरी, त्यापेक्षा अधिक हानिकारक म्हणजे जे जीवनानुभव आहेत, त्यांचेही अपुरे आकलन, तादात्म्यहीन परीक्षण हे आहे.[१]

भारतीय साहित्यशास्त्रात इसवी सनाच्या सातव्या शतकापासून काव्याच्या निर्मितीस आवश्यक ठरणाऱ्या 'काव्यकारणां'चा विचार करण्यात आला आहे. काव्यकारण म्हणजे कवितानिर्मितीस कारण असलेल्या गोष्टी होय. या गोष्टींमध्ये दण्डीने कवीची 'प्रतिभा', तिला साहाय्यभूत अशी कवीची 'व्युत्पन्नता' आणि कवीचे 'परिश्रम' अशा तीन कारणांचा विचार केला आहे. त्यासाठी त्याने अनुक्रमे 'प्रतिभा', 'श्रुत' आणि 'अभियोग' अशा संज्ञा वापरल्या आहेत. मम्मटाने 'शक्ती', 'निपुणता' आणि 'अभ्यास'; तर हेमचंद्र आणि वाग्भट यांनी 'प्रतिभा', 'व्युत्पत्ती' आणि 'अभ्यास' असे शब्द योजिले आहेत.[२]

तात्पर्य कवितानिर्मितीसाठी केवळ प्रतिभा असून चालत नाही, तिच्या जोडीला व्युत्पत्ती (व्यासंग) व अभ्यास (सराव-परिश्रम) याही बाबी मीमांसकांनी



डॉ.अविनाश आवलगावकर
गौरवग्रंथ

# मराठी समीक्षेचा पूर्वरंग

संपादक

प्राचार्य डॉ. अविनाश सांगोलेकर

डॉ. रा. गो. चवरे

# मराठी समीक्षेचा पूर्वरंग

## (डॉ. अविनाश आवलगावकर गौरवग्रंथ)

: संपादक :

प्राचार्य डॉ. अविनाश सांगोलेकर,

डॉ. रा. गो. चवरे

चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद

# मराठी समीक्षेचा पूर्वरंग
## (डॉ. अविनाश आवलगावकर गौरवग्रंथ)

संपादक : प्राचार्य डॉ. अविनाश सांगोलेकर, डॉ. रा.गो. चवरे

प्रकाशक :
चिन्मय प्रकाशन,
हॉटेल रिप्सजवळ, राजहंस कोचिंग क्लास शेजारी, पैठणगेट, औरंगाबाद.
मो. ९८२२८७ ५२१९,८७८८४३६१५९
Email : chinmayprakashan@gmail.com

अक्षरगुंफण :
ज्ञानेश्वर के. सुस्ते
वेदिका टाईपसेटर्स,
औरंगाबाद.

© संपादक

१४ मे २०२२

मुद्रक :
महारूद्र ऑफसेट,
औरंगाबाद.

मुखपृष्ठ :
अपूर्वा ग्राफिक्स

₹ ५००/-

ISBN - 978 - 81 - 953881 - 6 - 5

१२. ना. सी. फडके ह्यांचे समीक्षालेखन २५३
डॉ. सुनीता सांगोले

१३. आचार्य शं. द. जावडेकर ह्यांचे समीक्षालेखन २६८
डॉ. विद्यासागर पाटंगणकर

१४. डॉ. के. ना. वाटवे ह्यांचे समीक्षालेखन २८२
डॉ. प्रभाकर जोशी

१५. प्रा. द. के. केळकर ह्यांचे समीक्षालेखन २९३
डॉ. शोभा देशमुख

१६. वि. स. खांडेकर हयांचे समीक्षालेखन ३०३
प्रा. अविनाश सप्रे

१७. लालजी पेंडसे ह्यांचे समीक्षालेखन ३१३
प्राचार्य डॉ.अविनाश सांगोलेकर

१८. ग. त्र्यं. माडखोलकर ह्यांचे समीक्षालेखन ३२६
डॉ. देवानंद सोनटक्के

१९. श्री. के. क्षीरसागर ह्यांचे समीक्षालेखन ३५७
डॉ. शकुंतला क्षीरसागर

२०. प्रा. रा. श्री. जोग ह्यांचे समीक्षालेखन ३६६
डॉ. विलास खोले

२१. डॉ. रा. शं. वाळिंबे ह्यांचे समीक्षलेखन ३७८
डॉ. सतीश बडवे

२२. वामन मल्हार ह्यांचे साहित्यशास्त्र ३८८
डॉ. शिरीष गोपाळ देशपांड

२३. डॉ. अविनाश आवलगावकर : साहित्यिक मित्र ३९५
डॉ. रा. गो. चवरे

◆ लेखकांचा अल्प परिचय ४२२

❖❖❖

# १८. ग. त्र्यं. माडखोलकर ह्यांचे समीक्षालेखन

डॉ. देवानंद सोनटक्के

**प्रास्ताविक :**

ग. त्र्यं. माडखोलकर (१८९९-१९७६) हे वा.म. जोशी, ना. सी. फडके, वि. स. खांडेकर यांच्याप्रमाणेच कादंबरीकार व समीक्षक होते. शिवाय माडखोलकरांनी कविताही लिहिल्या आहेत आणि त्यांनी पत्रकारिताही केली आहे. त्यामुळे एक सर्जनशील - वैचारिक लेखक म्हणून त्यांचा साहित्यविचार व समीक्षा पाहणे गरजेचे आहे. १९२० नंतरच्या मराठी साहित्यविचारात कलावाद - जीवनवाद यांचे तीव्र द्वंद्व होते. ना. सी. फडके कलावादी, तर वि.स. खांडेकर जीवनवादी होते. मात्र या दोन्ही वादांचा समन्वय ग.त्र्यं. माडखोलकर यांच्या समीक्षेत दिसतो. त्यामुळे त्यांची समीक्षा व साहित्यविचार अभ्यासणे गरजेचे ठरते.


वयाच्या १९ व्या वर्षी ग. त्र्यं. माडखोलकरांनी लिहिलेला 'केशवसुतांचा संप्रदाय' या नावाचा लेख साप्ताहिक 'नवयुग' मध्ये प्रसिद्ध झाला आणि नावाजला गेला. पुढे २१ व्या वर्षी माडखोलकर साप्ताहिक 'केसरी'मध्ये राजकीय विषयावरील लेख लिहू लागले. त्यातील त्यांचे पहिले चार लेख आयर्लंडमधील Sinn Fein या चळवळीसंबंधी होते. वयाच्या २२ व्या वर्षीच माडखोलकरांनी 'आधुनिक कविपंचक' (१९२१) नावाचा समीक्षाग्रंथ लिहिला. या ग्रंथामुळे त्यांना कमालीची प्रसिद्धी मिळाली. कारण आधुनिक मराठी कवींची समीक्षा कुणी केलेली नव्हती.

प्राचार्य डॉ. सयाजीराजे मोकाशी गौरवग्रंथ

# कविता

## रूपबंध आणि आशयद्रव्य

संपादक : श्यामसुंदर मिरजकर



प्राचार्य डॉ. सयाजीराजे मोकाशी गौरवग्रंथ

# कविता
## रूपबंध आणि आशयद्रव्य

संपादक : श्यामसुंदर मिरजकर

नाग-नालंदा
प्रकाशन

नाग-नालंदा
प्रकाशन

**Kavita : Rupbandh Ani Ashaydravya**

Editor : Shyamsundar Mirajkar

ISBN : 978-93-82451-99-0


**कविता : रूपबंध आणि आशयद्रव्य**

**संपादक**

श्यामसुंदर मिरजकर
कला, वाणिज्य महाविद्यालय, मायणी,
ता. खटाव, जि. सातारा
Email : meshyam.mirajkar@gmail.com

**© सर्व हक्क सुरक्षित**

**प्रथमावृत्ती**
२९ मे, २०२३




**प्रकाशक**
त्र्यंबकेश्वर मिरजकर
नाग-नालंदा प्रकाशन
विशालनगर, मु. पो. इस्लामपूर,
ता. वाळवा, जि. सांगली - ४१५४०९
मोबा. : ९८८१०३५८०३
Email : tbmirajkar76@gmail.com

**अक्षरजुळणी**
संदीप गोंजारे
आयुष ग्राफिक्स, कोल्हापूर

**मुखपृष्ठ**
गणेश पोतदार, इस्लामपूर

**मुद्रक**
लायन प्रिंटिंग प्रेस, कोल्हापूर

**मूल्य : ₹ २४०** (दोनशे चाळीस रुपये फक्त

## अनुक्रम

**संपादकीय** - श्यामसुंदर मिरजकर । ०९

**विभाग एक । २१**

१. कविता म्हणजे काय?- वसंत आबाजी डहाके । २३

२. भाषिक कलाकृतीला
कविता पदापर्यंत पोहोचविणारी मूलभूत तत्त्वे - दा. गो. काळे । ५१

३. कवितेमधील प्रतिमा आणि प्रतीके - डॉ. महेंद्र कदम । ६०

४. कवितेमधील लयतत्त्व - डॉ. देवानंद सोनटक्के । ६८

५. कविता लिहिण्यामागची अ-कवितिक गोष्ट - प्रा. प्रवीण बांदेकर । ८२

६. काव्यानुभव - अेकनाथ पगार । ९२

७. कविता : स्वशोधाचे माध्यम - आसावरी काकडे । १३३

८. समकालीन कवितेतील भाषाविषयक संवेदन - डॉ. नीलिमा गुंडी । १४५

९. कविता आणि स्त्रीसंवेदन - डॉ. सुजाता शेणई । १५८

१०. कवितेचे अब्राह्मणी सौंदर्यशास्त्र - प्रा. सचिन गरुड । १७५

११. दीर्घ कवितेचा प्रदेश... - मंगेश काळे । १८९

**विभाग दोन । २०१**

१२. डॉ. सयाजीराजे मोकाशी : साहित्य-संस्कृतीचा वारकरी - डॉ. कृष्णा इंगोले । २०

- जीवनपट । २१५
- कविताविषयक संदर्भग्रंथ । २१८
- लेखकांचा परिचय । २२१

# कवितेतील लयतत्त्व

- डॉ. देवानंद सोनटक्के

मराठीत साहित्यात लयतत्त्वाचा विचार बा. सी. मर्ढेकरांनी पहिल्यांदा केला. तो काळ विसाव्या शतकाच्या प्रारंभाचा होता. या काळात पाश्च्यात्त्य साहित्यात अभिजातवादी साहित्यावरची प्रतिक्रिया म्हणून सौंदर्यविचारांचाच बोलबाला होता. या सौंदर्यविचाराचाच एक भाग लयसिद्धान्त आहे. मुळात 'लय' या मर्ढेकरी सिद्धान्ताचे मूळ कलाकृतीच्या 'घाट' विचारात आहे. 'साहित्यकृती ही खरोखर भौमितिक आकृती, चौरस किंवा वर्तुळ यांच्यासारखी आहे अशी कल्पना करायला हवी' असे मर्ढेकरांचे म्हणणे होते. म्हणजे शिल्पादी इतर कलेप्रमाणे साहित्यकृतीलाही आकार म्हणजे घाट असावा अशी त्यांची भूमिका होती. (गो. वि. करंदीकर : २०१४ : ९) हा आकार प्राप्त होण्याचे मुख्य कारणतत्त्व म्हणून लयतत्त्वाचा विचार पुढे आलेला आहे.

॥ १ ॥

मर्ढेकरांचे हे 'घाट' व 'लय' याबाबतचे म्हणणे त्या काळातील क्लाइव्ह बेलने मांडलेल्या आणि रॉजर फ्रॉयने विकसित केलेल्या सौंदर्यशास्त्रीय सिद्धान्ताचा परिणाम होता. (गो. वि. करंदीकर : २०१४ : ९) 'कलाकृतीच्या घाटाविषयीचे घाटासाठीच केलेले चिंतन निर्मात्यात घाटाविषयीची भावना निर्माण करते', असे फ्रॉयचे म्हणणे होते; तर; 'काही अज्ञात आणि गूढ नियमांनुसार जुळवलेले आणि एकत्रित आकारच विशिष्ट पद्धतीने आपणास हेलावून टाकतात', असे क्लाइव्ह बेलचे मत होते. या आकारांनाच बेल 'घाट' म्हणतो. या विचारांचा प्रभाव तत्कालीन सौंदर्यवादी कालखंडावर पडला